केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानांतर्गत- वन शेती उप अभियानाच्या सन २०१९-२० यसा वर्षासाठी रु.१३००.०४ लक्ष निधीच्या प्रकल्पासास प्रशासकीय मान्यता देऊन त्यापैंकी रु.४९७.६२ लक्ष निधीचा कार्यक्रम चालू आर्थिक वर्षात राबविण्यास मान्यता देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांकः शाशेअ-०८१९/ प्र.क्र.२०४/१४अे
मादाम कामा मार्ग, हुमात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई- ४०० ०३२
तारीख: १३ ऑगस्ट, २०१९

संदर्भ

१) कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्रमांक शाशेअ-२०१७/प्र.क्र.१२६/४अे, दि. ८ डिसेंबर, २०१७.
२) सहायक आयुक्त (NRM) कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. ७-०२/२०१९- NRM- SMAF, दि. २४ जून, २०१९.
३) अवर सचिव, कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र.७-६/२०१७-सीसी, (४१००८), दि.१८ जुलै, २०१९.

प्रस्तावना

सन २०१७-१८ या वर्षापासून केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय शाश्वत शेती अभियान अंतर्गत- वन शेती उप अभियान राबविण्यात येत आहे. सदर उप अभियानाच्या मार्गदर्शक सूचनानुसार उप अभियानामध्ये केंद्र व राज्य हिश्श्याच्या निधीचे प्रमाण ६०: ४० असे आहे. सदर उप- अभियान राज्यात राबविण्यासाठी संदर्भाधीन दि. ८ डिसेंबर, २०१७ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

केंद्र शासनाने संदर्भाधीन दि. २४ जुन, २०१९ च्या पत्रान्वये, सन २०१९-२० या वर्षासाठी एकूण रु.१३००.०४ लक्ष निधीच्या प्रकल्पास मान्यता देऊन सन २०१९-२० या प्रथम वर्षात रु.४९७.६२ लक्ष रक्कमेचा कार्यक्रम राबविण्यास मान्यता दिलेली आहे. मंजुर प्रकल्पामध्ये लाभार्थी हिस्सा रु.६५०.०२ लक्ष असून अनुदानाचा हिस्सा रु.६५०.०२ लक्ष आहे. सन २०१९-२० च्या राबवावयाच्या मंजुर कार्यक्रमामध्ये लाभार्थी हिस्सा रु.२४८.८१ लक्ष असून अनुदानाची रक्कम रु.२४८.८१ लक्ष आहे. अनुदानाच्या रक्कमेमध्ये केंद्र हिस्सा रु.१४९.२९ लक्ष असून राज्य हिस्सा रु.९९.५२ लक्ष एवढा आहे.

कार्यक्रमाची अंमलबजावणी सन २०१९-२० या वर्षात करण्यासाठी केंद्र शासनाने पहिल्या हप्त्याचा रु.७५ लक्ष निधी संदर्भाधीन दि.१८ जुलै, २०१९ च्या पत्रान्वये वितरीत केला आहे. केंद्र शासनाने सन २०१९-२० या वर्षासाठी मंजूर केलेल्या रु.१३००.०४ लक्ष निधीच्या प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देऊन त्यापैंकी रु.४९७.६२ लक्ष निधीचा कार्यक्रम चालू आर्थिक वर्षात

राबविण्यास मान्यता देणे व केंद्र शासनाने वितरीत केलेला सर्वसाधारण प्रवर्गाचा केंद्र हिश्श्याचा रु.५९.१० लक्ष व त्या प्रमाणात आवश्यक समरुप राज्य हिश्श्याचा रु.३९.४० लक्ष असा एकूण रु.९८.५० लक्ष निधी आयुक्त (कृषि) यांना अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर (BDS) वितरीत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

१. केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानांच्या - वन शेती उप अभियानांतर्गत सन २०१९-२० या वर्षासाठी रु.१३००.०४ लक्ष रक्कमेचा प्रकल्प राज्यात राबविण्यास प्रशासकीय मान्यता देऊन त्यापैंकी रु.४९७.६२ लक्ष निधीचा कार्यक्रम चालु आर्थिक वर्षात राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. प्रकल्पाच्या रु.१३००.०४ लक्ष निधीमध्ये लाभार्थी हिस्सा रु.६५०.०२ लक्ष व अनुदानाचा हिस्सा रु.६५०.०२ लक्ष रक्कमेचा समावेश आहे.

३. चालु आर्थिक वर्षामध्ये राबवावयाच्या रु.४९७.६२ लक्ष निधीमध्ये लाभार्थी हिस्सा रु.२४८.८१ लक्ष व अनुदानाच्या रु.२४८.८१ लक्ष रक्कमेचा समावेश आहे.

४. उपरोक्त प्रशासकीय मान्यतेस अनुसरून सदर कार्यक्रामाची सन २०१९-२० या वर्षात सर्वसाधारण प्रवर्गासाठी अंमलबजावणी करण्यासाठी केंद्र हिस्सा रु.५९.१० लक्ष व त्याप्रमाणात आवश्यक समरुप राज्य हिस्सा रु.३९.४० लक्ष असा एकूण रु.९८.५० लक्ष निधी आयुक्त (कृषी) यांना अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर (BDS) वितरीत करण्यात येत आहे.

५. सदर खर्च पुढील लेखाशीर्षाखालील सन २०१९-२० च्या मंजूर तरतुदीतून करण्यात यावा.

अ. क्र.	केंद्र हिस्सा	राज्य हिस्सा
	मागणी क्रमांक-डी-३ २४०१-पीक संवर्धन, १०९-विस्तार व शेतकरी प्रशिक्षण (०१) (५६) राष्ट्रीय शाश्वत शेती अभियान- वनशेती उप अभियान (कें.पु.यो.) (केंद्र हिस्सा- ६०%) (२४०१ ए ८२४) ३३ अर्थसहाय्य,	**मागणी क्रमांक-डी-३** २४०१-पीक संवर्धन, १०९-विस्तार व शेतकरी प्रशिक्षण (०१) (५७) राष्ट्रीय शाश्वत शेती अभियान- वनशेती उप अभियान (कें.पु.यो.) (राज्य हिस्सा- ४०%) (२४०१ ए ८३३), ३३ अर्थसहाय्य

६. सदर निधी लाभार्थ्यांना PFMS प्रणालीद्वारे वितरीत होत असल्याची खातरजमा आयुक्त, कृषी यांनी करावी.

७. उप- अभियानाची अंमलबजावणी वनशेती उप अभियानाच्या मार्गदर्शक सूचना, संदर्भाधीन दि.८ डिसेंबर, २०१७ चा शासन निर्णय व केंद्र शासनाच्या दि.२४ जुन, २०१९ व १८ जुलै, २०१९ च्या पत्रातील सुचनानूसार केल्या जात आहे, यावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी संचालक, फलोत्पादन यांची राहिल.

८. सदर निधी खर्च करताना तो विहित कार्यपध्दती अनुसरून, सर्व वित्तीय कायदे/नियमांचे/ प्रक्रियेचे व वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत बजेट व कोषागार नियमावलीनुसार खर्च करण्याची कार्यवाही अमंलबजावणी यंत्रणानी करावी. कोणत्याही परिस्थितीत कुठल्याही शासन निर्णयाचा वा परिपत्रकाचा भंग होणार नाही, याबाबत दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधित क्षेत्रिय कार्यालयाची राहील.

९. सदर निधीचे जिल्हा निहाय वितरण करण्यास तसेच खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी संचालक (फलोत्पादन) यांना राज्य नियंत्रक म्हणून घोषित करण्यात येत आहे. निधीचे आहरण व संवितरण करणेसाठी विविध स्तरावरील अधिकाऱ्यांना पुढीलप्रमाणे नियंत्रण तसेच आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे :-

अ.क्र.	स्तर	नियंत्रण अधिकारी	आहरण व संवितरण अधिकारी
१.	आयुक्तालय स्तर	संचालक (फलोत्पादन), कृषि आयुक्तालय, पुणे	सहाय्यक संचालक (लेखा-१), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२.	जिल्हास्तर	संबंधित जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी	संबंधित जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालयातील लेखाधिकारी

१०.सदर कार्यक्रमाची क्षेत्रीय स्तरावर अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने संचालक (फलोत्पादन) यांनी सविस्तर सूचना निर्गमित कराव्यात.

११.सदर निधी खर्च करताना केंद्र शासनाच्या उप अभियानाच्या मार्गदर्शक सूचना, संदर्भाधीन दि.८ डिसेंबर, २०१७ चा शासन निर्णय, केंद्र शासनाच्या दि.२४ जुन, २०१९ व दि.१८ जुलै, २०१९ च्या पत्रातील सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

१२.सदर शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.१ एप्रिल,२०१९ च्या शासन परिपत्रकातील अटींच्या पालनेच्या अधीन राहून व सदर परिपत्रकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

१३.सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८१४११३८१००१०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

KIRAN N PATIL

Digitally signed by KIRAN N PATIL
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=657661007c4f6885bf8deae62f13606632589e592d8c18ceb
9a49bfd30471850, postalCode=400032,
street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=64a3950913946fa68fe576faead463fd8ae1e3844a820
d921b663674927a476e, ou=AGRICULTURE DEPT, o=GOVERNMENT
OF MAHARASHTRA, cn=KIRAN N PATIL
Date: 2019.08.14 11:49:19 +05'30'

(डॉ. किरण पाटील)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

२. सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. कुलगुरू, कृषी विद्यापीठे (सर्व)
४. संचालक (फलोत्पादन), कृषि आयुक्तालय,पुणे
५. सर्व सन्माननीय विधीमंडळ सदस्य द्वारा विधानमंडळ सचिवालय, मुंबई
६. सर्व संचालक / सहसंचालक, कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१
७. विभागीय कृषि सहसंचालक (सर्व)
८. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)
९. सर्व कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद
१०. महालेखापाल, महाराष्ट्र १/२, मुंबईनागपूर/ (लेखा परिक्षा(/(लेखा व अनुज्ञेयता)
११. महालेखाकार (स्थानिय) निकाय लेखापरिक्षा व लेखा प्रतिष्ठा भवन,१०१ महर्षी कर्वे मार्ग, मुंबई-४०००२०
१२. माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई-३२.
१३. नियोजन विभाग (का-१४३१) /मंत्रालय, मुंबई-३२
१४. वित्त विभाग (व्यय-१ व अर्थसंकल्प - १३) / मंत्रालय, मुंबई-३२
१५. मा. राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव
१६. मा. मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव
१७. निवड नस्ती (कार्यासन -१४अे)